मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आळंदीजवळील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा; आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश



> देव-देश अन् धर्मासाठी काम करणारे भाजपा महायुतीचे सरकार राज्यात, केंद्रात आहे. गोरक्षण आणि गोसंवर्धनासाठी गोहत्या बंदीचा कायदा राज्यात लागू करण्याची भूमिकाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. टाळगाव चिखली येथील टीपी स्कीम प्रशासनाने रद्द केली. त्यानंतर मौजे चऱ्होली येथील टीपी स्कीमला स्थगिती दिली. त्यावर काही लोकांनी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तर मुख्यमंत्र्यांनी जाहीर कार्यक्रमात एका मिनिटांत प्रश्न मार्गी लावला. मोशी ग्रामस्थ आणि गोरक्षक, हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदर कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याचे आदेश दिले, याबद्दल त्यांचे तमाम गोरक्षण, गोसंवर्धक आणि शेतकरी यांच्यासह सकल हिंदू समाजाच्या वतीने मनापासून आभार व्यक्त करतो.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी व तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल. वारकरी, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी वारी पायी पालखी सोहळा पुण्यात दाखल झाला आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांशी संवाद साधला.

दोन दिवसांपूर्वी, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याबाबत ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते. तसेच, भाजपा आमदार महेश लांडगे यांनीही महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. मोशी, चऱ्होलीच्या नागरिकांची निवेदने स्वीकारा आणि त्यावर सकारात्मक निर्णय घ्या, असे साकडे आमदार लांडगे यांनी घातले होते. त्याला अखेर यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये आळंदी शहरा जवळ कत्तलखाण्याचे आरक्षण विकास आराखड्यामध्ये टाकण्यात आले आहे. त्यामुळे श्रीक्षेत्र आळंदी सारख्या देवस्थानाच्या परिसरामध्ये अशा पद्धतीने कत्तलखाण्याचे आरक्षण टाकण्यात आल्याने त्याबाबत सर्व स्तरातून नाराज व्यक्त झाली. प्रशासनाने सदर आरक्षण हटवावे, यासाठी आमदार लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला.

पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, जो काही विकास आराखडा आहे. त्या विकास आराखड्यामध्ये मोशी-आळंदी येथे कत्तलखाण्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे. मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही. त्याबाबतच्या आरक्षण वगळण्याच्या आदेश मी दिले आहेत. वारकऱ्यांना आणि वारकरी नेत्यांना सांगू इच्छितो कोणत्याही परिस्थितीत कत्तलखाना होणार नाही.

# शिवतेज प्रतिष्ठान व संत तुकाराम व्यापार संकुलातर्फे वारकऱ्यांची सेवा

## अल्पोपहार आणि औषधांचे मोफत वितरण; पिंपरी चिंचवड नगरी भक्तीभावात मग्न



**पिंपरी | प्रतिनिधी**

ज्ञानोबा-तुकाराम या जयघोषात, रिमझीम पावसात पंढरपूरच्या दिशेने हरिनामाचा गजर करत मार्गस्थ झालेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याचे शहरात आगमन झाले आणि पिंपरी चिंचवड नगरी भक्तिभावात मग्न झाली.

अखंड हरिनामाच्या गजरात निघालेल्या संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे सालाबाद प्रमाणे याही वर्षी निगडी येथे शिवतेज प्रतिष्ठान व श्री संत तुकाराम महाराज व्यापार संकुलाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. २० वर्ष झाले ही सेवा अविरत चालू आहे.

यावेळी मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य सुरेश वाडकर विद्युत सनियंत्रण समिती पुणे जिल्हा सदस्य संतोष सौंदणकर, रवींद्र चौधरी, नंदकिशोर तोवर, विजय शिनकर, सुहास पाठक, गणेश वाडकर, दिनकर चव्हाण, प्रफुल पोटफोडे, सुनील कांकरिया ओमप्रसाद परदेशी, वाडकर ताई, उंडे ताई, कामठे ताई तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील दिंडी प्रमुखांचा पुष्पहार आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व वारकरी भाविकांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र होमिओपॅथिक फीमेल डॉक्टर्स असोसिएशन (MHFDA - PIMPRI CHINCHWAD TEAM) च्या वतीने वारकऱ्यांना मोफत औषधं देण्यात आली.

# पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त वाहतूक बदल

## पुणे-सोलापूर रस्ता, हडपसर -सासवड रस्ता वाहतुकीस बंद; पर्यायी मार्गांचा वापर करावा

**पुणे | प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा रविवारी (२२ जून) श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. पालखी सोहळा प्रस्थान सोहळ्यानिमित्त रविवारी मध्यरात्री दोननंतर नाना-भवानी पेठेत वाहतूक बदल करण्यात येणार आहे. पालखी सोहळा पुणे-सोलापूर महामार्गावर आल्यानंतर सोलापूर रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. रविवारी पहाटेपासून पोलिसांकडून वाहतूक बदल करण्यात येणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.



श्री ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिर येथून प्रस्थान ठेवणार आहे. श्री तुकाराम महाराज यांची पालखी नाना पेठेतील श्री निवंडुंग्या विठोबा मंदिर येथून प्रस्थान ठेवणार आहे. दोन्ही पालख्या नाना-भवानी पेठेतून लष्कर भागात येणार आहेत. तेथून पुणे-सोलापूर महामार्गाने हडपसर गाडीतळपर्यंत एकत्रित जाणार आहेत. गाडीतळ येथून सासवड रस्त्याने दिवे घाटमार्गे श्री ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी सासवड येथे रविवारी सायंकाळी मुक्कामी पोहोचणार आहे. श्री तुकाराम महाराज पालखी यांची हडपसर गाडीतळमार्गे पुणे-सोलापूर महामार्गावरुन लोणी काळभोर येथे मुक्कामी येणार आहे. मध्यरात्री दोननंतर टप्याटप्याने पालखी मार्ग वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. पालखी मार्गस्थ झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात येईल.

### पोलिसांचे आवाहन

» पालखी प्रस्थान मार्गावर सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई
» पालखी प्रस्थानानंतर टप्याटप्याने वाहतूक पूर्ववत
» सासवडकडे जाणाऱ्या दिंडीतील वाहनांनी भैरोबा नाला, लुल्लानगर, कोंढवा, बोपदेव घाटाचा वापर करावा
» वाहतूक नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक – ०२०-२६६८५००० किंवा २६६८४०००

**पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त वाहतुकीस बंद असणारे रस्ते पुढीलप्रमाणे –**

संत कबीर चौक ते बेलबाग चौक, संत कबीर चौक ते रामोशी गेट चौक, ढोले पाटील चौक (सेव्हन लव्हज चौक) ते रामोशी गेट चौक, गोळीबार मैदान चौक ते ढोले पाटील चौक, मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान, बिशप स्कूल ते मम्मादेवी चौक, वानवडी बाजार ते मम्मादेवी चौक, ट्रायलक हॉटेल ते महात्मा गांधी रस्ता ते रामोशी गेट चौक, मोरओढा ते भैरोबा नाला चौक, भैरोबानाला चौक ते मम्मादेवी चौक, जांभुळकर चौक ते फातिमानगर चौक, सोलापूर रस्त्यावरील बी. टी. कवडे रस्ता चौक, काळूबाई मंदिर चौक, रामटेकडी, वैदुवाडी चौक, मगरपट्टा चौक, हडपसर गाव वेस (वाहतूक बंद मध्यरात्री दोन ते दुपारी दोन) सीरम चौक ते सोलापूर रस्ता, १५ नंबर फाटा ते सोलापूर रस्ता, मंतरवाडी फाटा ते सासवड, खडीमशीन चौक ते बोपदेव घाट (वाहतूक बंद पहाटे पाच ते रात्री बारापर्यंत)

# आयटी पार्कमधील जलकोंडीची कारणे मानवनिर्मित!

## 15 ठिकाणी जलप्रवाह अडवून त्यांवर कंपन्यांसह व्यावसायिक संकुले व गृहनिर्माण संकुले

**पुणे | प्रतिनिधी**


हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कचे रूपांतर 'वॉटर पार्क'मध्ये होण्यामागे मानवनिर्मित कारणे असल्याचे स्पष्ट झाले आहे. शासकीय यंत्रणांनी केलेल्या सर्वेक्षणात आयटी पार्कमध्ये १५ ठिकाणी जलप्रवाह अडवून त्यांवर कंपन्यांसह व्यावसायिक संकुले व गृहनिर्माण संकुले उभारण्यात आल्याचे निदर्शनास आले असून, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) या अनधिकृत बांधकामांवर कारवाईची भूमिका घेतली आहे.




हिंजवडीतील आयटी पार्कमध्ये पाऊसकाळात जलकोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. आयटी पार्कच्या परिसरात हिंजवडी, माण, मारुंजीतील रस्त्यांवर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचते आहे. याला नैसर्गिक जलप्रवाहांवरील अतिक्रमणे कारणीभूत असल्याचा दावा स्थानिक रहिवाशांनी केला होता. त्यामुळे या समस्येचे मूळ जाणून घेण्यासाठी 'पीएमआरडीए'ने नुकतेच आयटी पार्कमधील नैसर्गिक प्रवाहांचे सर्वेक्षण केले.

आयटी पार्कमध्ये डोंगरावरून खाली येऊन नदीत मिसळणारे ओढे आणि नाले १५ ठिकाणी रोखण्यात आल्याचे सर्वेक्षणात स्पष्ट झाले. त्या ठिकाणी मोठी बांधकामे झाली आहेत. या बांधकामांवर कशी कारवाई करायची, असा तिढा आता निर्माण झाला आहे. कंपन्या, व्यावसायिक संकुले आणि गृहनिर्माण संकुलांवर कारवाई करावयाची झाल्यास ती पाडावी लागतील. एवढ्या मोठ्या प्रमाणात कारवाई करण्याऐवजी या बांधकामांसाठी अडविण्यात आलेल्या नैसर्गिक प्रवाहांना पर्यायी मार्ग काढून देण्याचा विचार 'पीएमआरडीए'कडून सुरू आहे. मात्र, यामुळे समस्या कायमस्वरूपी सुटणार नसल्याचा स्थानिक रहिवाशांचा दावा आहे.

> 'पीएमआरडीए'च्या सर्वेक्षणात जलप्रवाह अडविण्यात आल्याची १५ ठिकाणे उघडकीस आली. या बांधकामांना दिलेल्या परवानग्या तपासण्यात येत आहेत. त्याचबरोबर नैसर्गिक प्रवाहांना वाट काढून देण्यासाठी या १५ ठिकाणी दीर्घकालीन उपाययोजना हाती घ्याव्या लागणार आहेत. मुख्यमंत्री हे प्राधिकरणाचे अध्यक्ष असल्याने त्यांच्याकडेही याबाबत अहवाल सादर केला जाणार आहे.
>
> **- डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.**



# प्रगणक गटाच्या मांडणीला प्रारंभ, नऊ टप्प्यात प्रक्रिया पुर्ण होणार

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक विभागाकडून कामकाजास सुरूवात केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य शासनाकडून प्रभाग पुनर्रचनेबाबत कालबद्ध कार्यक्रमाचा आदेश येताच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक विभागाकडून कामकाजास सुरुवात केली. पहिल्या टप्प्यातील प्रगणक गटांच्या मांडणीला प्रारंभ झाला. नऊ टप्प्यांतील संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून राज्य निवडणूक आयुक्तांकडून अंतिम मंजुरी घेण्यात येईल. त्यानंतर तीन महिन्यांच्या कालमर्यादेत प्रभाग रचनेची अधिसूचना जाहीर करण्यात येणार आहे. प्रभाग रचना शहरातील उत्तर दिशेकडून म्हणजेच चिखलीतून सुरू होईल. त्यामुळे चिखली पहिला तर सांगवी हा शेवटचा प्रभाग असण्याची दाट शक्यता आहे.

मागील तीन वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका चार महिन्यांत पूर्ण करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार राज्य शासनाने अ, ब, क, ड वर्गाच्या महानगर पालिकांच्या प्रभाग रचनेचा आदेश १० जूनला दिला. त्यानुसार कालबद्ध कार्यक्रमात नमूद करत विहीत मुदतीत टप्पा निहाय कार्यवाही पूर्ण होईल, याबाबत दक्षता घेवून घोषित कालमर्यादा पाळवी लागणार आहे.

त्यानुसार प्रथम टप्प्यातील ११ ते १६ जून २०२५ पर्यंत पूर्ण करायची प्रगणक गटांच्या मांडणीबाबत कार्यवाही सुरू झाली आहे. दुसऱ्या टप्प्यात जनगणनेची प्राप्त माहिती तपासणी, स्थळ पाहणी, गूगल मॅपवर प्रभागांचे नकाशे तयार करणे, नकाशा निश्चित केलेल्या प्रभाग हद्द तपासणी, प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर स्वाक्षरी करण्याचे काम पूर्ण केले जाणार आहे.

कालमर्यादा पाळण्याच्या दृष्टीने महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांची लवकरच निवडणूक कामकाजास नियुक्ती करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसाठी प्रभाग रचना तयार करताना २०११ मध्ये झालेली जनगणना ग्राह्य धरावी लागणार आहे. प्रभाग रचना चार सदस्यीय असणार आहे. त्यामुळे २०१७ प्रमाणे २०२५ ची महानगरपालिका निवडणूक ही याच जनगणनेच्या आकडेवारीवरून होणार आहे.




### प्रभाग रचनेत राजकीय हस्तक्षेप होणार नाही

» २०१७ च्या महापालिका निवडणुकीत पहिल्यांदा गूगल मॅपद्वारे प्रभागांची रचना करण्यात आली. त्यापूर्वी प्रभाग रचना निश्चित करताना कागदावर नकाशे काढले जात होते. त्यात प्रभागांची हद्द निश्चित करण्यासाठी नदी, नाले, ओढे या नैसर्गिक हद्दीबरोबरच रस्त्यांचा विचार केला होता. मात्र त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोप करण्यात आला होता. राजकीय बळ वापरून हवी तशी प्रभाग रचना करण्याचे प्रकार घडत होते. त्याला पायबंद घालण्यासाठी निवडणूक आयोगाने गूगल मॅपद्वारे प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता प्रभागरचनेमध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप होणार नसल्याचा दावा निवडणूक प्रशासनाकडून केला जात आहे.

### प्रभाग रचनेची उत्तरेकडून सुरुवात

» प्रभाग रचनेची सुरूवात शहराच्या उत्तर दिशेकडून होत आहे. उत्तरेकडून ईशान्य उत्तर-पूर्व त्यानंतर पूर्ण दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकून शेवट दक्षिणेकडे होणार आहे. प्रभागांना क्रमांकही त्याच पद्धतीने दिले जाणार आहे. इमारत-चाळी व घरांचे विभाजन दोन प्रभागात होणार नाही. प्रभाग रचना करताना लोकसंख्या भागिले महापालिकेची एकूण सदस्य संख्या गुणिले संबंधित निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या या सूत्रानुसार एका प्रभागात समाविष्ट करावयाची सरासरी लोकसंख्या निश्चित केली जाईल. प्रगणक गट न फोडल्याने प्रभागाची लोकसंख्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी वा जास्त होत असल्यास, त्याची कारणे प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करावे लागणार आहे.

> शहराच्या उत्तर दिशेने प्रभागरचना सुरु करण्यात येणार आहे. शहरातील चिखली भागातून सुरुवात करून शेवट सांगवी मध्ये होणार आहे. मुख्य रस्ते, नैसर्गिक नाले, नदी यांचा विचार केला जाणार आहे. कालमर्यादेत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.
>
> - अविनाश शिंदे , सहाय्यक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# अखेर खडकी मेट्रो स्टेशन प्रवाशांच्या सेवेत

## पिंपरी ते स्वारगेट मार्गावरील खडकी मेट्रो स्टेशन शनिवार (दि.21) पासून प्रवासी सेवेत दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी ते स्वारगेट मार्गावरील खडकी मेट्रो स्टेशन शनिवार (दि.21) पासून प्रवासी सेवेत दाखल होत आहे. त्यामुळे खडकी बाजार, खडकी कॅन्टोमेंट, औंध, रेंजहिल्स आदी भागांसह संरक्षण विभागाच्या विविध आस्थापनेतील कर्मचारी व अधिकारी तसेच, विद्यार्थी, कामगार, व्यापारी व नागरिकांना मेट्रोने प्रवास करणे सुलभ होणार आहे.

पिंपरी ते जिल्हा न्यायालय अशी मेट्रो 1 ऑगस्ट 2023 पासून सुरू झाली आहे. मात्र, खडकी आणि रेंजहिल्स मेट्रो स्टेशन अद्याप कार्यान्वित झालेले नाही. प्रवाशांना बोपोडी ते शिवाजीनगर असा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे खडकी व रेंजहिल्स भागांतील नागरिकांची गैरसोय होत आहे. त्या संदर्भात 'पुढारी'ने वारंवार छायाचित्रासह वृत्त प्रसिद्ध केले आहे. अखेर, खडकी मेट्रो स्टेशन प्रवासासाठी खुले होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

हे स्टेशन खडकी रेल्वे स्टेशनला लागून आहे. या मेट्रो स्टेशनवरून प्रवाशांना थेट खडकी रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी मार्ग असल्यामुळे नागरिकांना मेट्रो आणि रेल्वे या दोन्ही वाहतूक सेवांचा लाभ घेता येणार आहे.

हे स्टेशन सुरू झाल्यामुळे प्रवाशांना खडकी, पुणे विद्यापीठ, औंध आयटी पार्क, खडकी कॅन्टोन्मेंट, खडकी बाजार, रेंजहिल्स, औंध रस्ता, ऑर्डनन्स फॅक्टरी रुग्णालय, मुळा रोड अशा महत्त्वाच्या ठिकाणी पोहचणे सोयीस्कर होणार आहे. मात्र, रेंजहिल्स स्टेशनचे काम बंद असल्याचे चित्र आहे. त्यामुळे खडकी ते शिवाजीनगर असा प्रवास करावा लागणार आहे.

दरम्यान, संरक्षण विभागाकडून जागा ताब्यात येण्यास विलंब झाल्याने खडकी मेट्रो स्टेशनचे काम सुरू करण्यास उशीर झाला. त्यामुळे हे स्टेशन उशिराने तयार झाले आहे, असे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.




### खडकी परिसरातील नागरिकांना फायदा होणार

» पुणे मेट्रोच्या विस्तारात खडकी स्थानकाची भर पडल्याने पुणे व पिंपरी चिंचवड या शहरांना जोडणाऱ्या या रस्त्यावरील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट झाली आहे. खडकी आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना या स्टेशनचा फायदा होणार आहे, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

# विरोधकांनी आपल्या पॅनेलचे चेअरमन जाहीर करावेत : अजित पवार

**माळेगाव कारखाना पंचवार्षिक निवडणूक, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांनी आपापल्या पॅनेलचे चेअरमन जाहीर करावेत, असे आव्हान दिले.**

**पुणे | प्रतिनिधी**

जवळपास 19 हजार 700 ऊस उत्पादक शेतकरी सभासदांच्या प्रपंचाचा प्रश्न असल्याने मी चेअरमनपदाची उमेदवारी जाहीर केली; मात्र त्यामुळे विरोधकांच्या पोटात का दुखतंय? असा सवाल करत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांनी आपापल्या पॅनेलचे चेअरमन जाहीर करावेत, असे आव्हान दिले.

पवार म्हणाले, माळेगाव साखर कारखान्याची स्थापना 1955 मध्ये झाली. आज जवळपास 70 वर्षांचा काळ लोटला आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील सभासदांच्या कुटुंबाचा, त्यांच्या प्रपंचाचा प्रश्न आहे. मला साखर कारखानदारीतला मोठा अनुभव आहे. मी राज्याचा उपमुख्यमंत्री असल्याने माझ्या शब्दाला वजन आहे.




## वय झाल्यावर थांबायचं असतं

**» निसर्गाचा नियम आहे, वय झाल्यानंतर शारीरिक तसेच मानसिक क्षमतेत बदल घडतो, थकवा जाणवतो अशावेळी कार्यक्षमता कमी होते, परंतु काही लोक वयाचा विचार न करता केवळ स्वार्थासाठी हट्टाने उभे आहेत, अशी टीका चंद्रराव तावरे यांचे नाव न घेता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.**

> **आपल्या सर्वांच्या सहकार्याने जर मी माळेगाव कारखान्याचा चेअरमन झालो तर माझ्या कामाच्या पद्धतीनुसार मी सकाळी सात वाजताच संचालकांची मीटिंग घेईल. त्यामुळे त्यांना देखील लवकर उठून काम करण्याची सवय लागेल. तसेच कोणालाही गाडी, नाश्ता, जेवण इतर अनावश्यक खर्च करू देणार नाही.**
>
> **- अजित पवार , उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

बारामती तालुक्याच्या विकासाचा झंझावात आपण पाहिला आहे. माझ्या अधिपत्याखाली असलेला सोमेश्वर साखर कारखाना काही वर्षांपूर्वी अडचणीत होता, परंतु आज तोच कारखाना आता राज्यात उच्चांकी ऊस दर देणारा कारखाना म्हणून ओळखला जातो. त्याच पद्धतीने माळेगावचा नावलौकिक राज्यात मोठा आहे.

आपल्या सत्ताधारी संचालकांनी मागील पाच वर्षात सातत्याने उच्चांकी ऊस दर दिला आहे, असे असताना विरोधक चुकीच्या पद्धतीने आरोप करून कारखान्यावर कर्ज असल्याचा अपप्रचार करतात; मात्र जर कर्ज असते तर राज्यातील खासगी आणि सहकारी अशा जवळपास 200 साखर कारखान्यांपेक्षा मागील गाळप हंगामाच्या उसाच्या उचलीपोटी माळेगावने सर्वात जास्त ॲडव्हान्स दिला आहे, अजून फायनल पेमेंट दिले नाही.

तुम्ही जर माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत माझ्या विचाराचे पॅनेल निवडून दिले, तर मी कोणत्याही भ्रष्टाचाराला थारा न देता, काटकसरीने कारखाना चालवून दाखविल. माझ्या कामाची पद्धत तुम्हाला माहिती आहे. मी शब्दाचा पक्का आहे. दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून माझी ख्याती आहे.

माळेगाव कारखान्याच्या परिसराचा विकास करून चेहरामोहरा बदलणार आहे. त्यासाठी सभासदांच्या पैशाला हात न लावता केंद्र, राज्य शासनाच्या माध्यमातून तसेच आमदार फंडातून, डीपीडीसी, सीएसआर आदींच्या माध्यमातून निधी आणण्याची धमक माझ्यामध्ये आहे. मी जवळपास 7 लाख 20 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे.

फक्त माळेगाव कारखान्याच्या बाबतीत माझा तुमचा संबंध येणार आहे असे समजू नका. मी तुमचा आमदार तसेच पालकमंत्री देखील आहे. त्यामुळे नोकरी, बदली, पोलिस ठाणे, महसूल आदींबाबत मी तुम्हाला मदत करू शकतो, तसेच गावाच्या सामाजिक विकासासाठी माझी तुम्हाला मदत राहील, असे पवार यांनी सांगितले.

आपल्याला निरा नदी स्वच्छ ठेवायची आहे. त्या दृष्टीने झिरो डिस्चार्जबाबत प्रयत्न करणार आहे. केंद्र तसेच राज्य शासनाच्या बदलत्या धोरणानुसार काही निर्णय घ्यावे लागतात. माझे केंद्रातील तसेच राज्यातील मंत्र्यांशी चांगले संबंध आहेत. राज्याचे कृषिमंत्री माझ्या पक्षाचे आहेत. असे असताना तुम्हाला एआय टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून जास्तीचे ऊस उत्पादन घेण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# जिल्हा बँकेची बारामती शाखा रात्री उशिरापर्यंत सुरू, चौकशीसाठी समिती स्थापन

**चौकशीसाठी सहायक निबंधक (सहकारी संस्था) यांच्यासह पोलीस आणि महसूल प्रशासनाची चौकशी समिती नेमण्यात आली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची बारामतीतील मुख्य शाखा रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचा आणि त्या ठिकाणी माळेगाव सहकारी साखर कारखाान्याच्या निवडणुकीच्या मतदार याद्या आढळून आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी सहायक निबंधक (सहकारी संस्था) यांच्यासह पोलीस आणि महसूल प्रशासनाची चौकशी समिती नेमण्यात आली आहे.

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी येत्या रविवारी (२२ जून) मतदान होत आहे. बुधवारी (१८ जून) रोजी रात्री जिल्हा बँकेची बारामतीतील मुख्य शाखा रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे निदर्शनास आले. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री दत्तात्रय भरणे या दोघांशी संबंधित व्यक्ति त्यावेळी बँकेत उपस्थित होत्या. तसेच तेथे माळेगावच्या मतदार याद्या आणि अन्य साहित्य आढळून आल्याचा आरोप सहकार बचाव पॅनेलचे रंजन तावरे यांनी केला.

या प्रकरणी बँकेचे सहायक शाखा व्यवस्थापक संजय जगदाळे म्हणाले, 'बँक सायंकाळी साडेपाच वाजता बंद होते. बँक सुरू असल्याचे समजल्यावर रात्री बँकेत आलो. मी आणि रंजन तावरे एकाचवेळी तेथे पोहोचलो. बँकेच्या वरील मजल्यावर संगणकीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे तेथे लोक बराच वेळ उपस्थित असतात. माळेगावच्या याद्या कशा सापडल्या,




## 'एसआयटी'कडून चौकशी करा- खासदार सुळे

**» माळेगाव साखर कारखान्याचे मतदान दोन दिवसांवर आले असताना बारामतीतील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा रात्री उशिरापर्यंत उघडी कशी असू शकते, असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. बँकेला याचे उत्तर द्यावे लागेल. या प्रकरणाची एसआयटी चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.**

हे सांगता येणार नाही.

निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने म्हणाले, रात्री अकरा वाजता बँक सुरू का होती, याचा खुलासा मागितला आहे. याशिवाय सहायक निबंधक, पोलीस निरीक्षक, मंडल अधिकारी यांची समिती नेमण्यात आली आहे. समितीच्या अहवालावर पुढील बाबी ठरतील. तावरे यांनी पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला आहे.'

उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड म्हणाले, 'आचारसंहितेच्या पथकाला न्यायदंडाधिकाऱ्यांचे अधिकार असतात. संबंधित घटनेची सखोल चौकशी करून ते अहवाल सादर करतील. त्यानुसार काही चुकीचे घडले असेल तर पुढील कायदेशीर कारवाई होईल.'